शासकीय व निमशासकीय सेवेत आरक्षित पदावर मागास वर्गीयांची भरती – सरळ सेवा भरतीचा अनुशेष भरून काढण्यासाठी खास भरती – निवड मंडळांना परीक्षा घेण्यातून सूट......

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. प्रानिम-२५८९/प्र.क्र. ३१६/८९/१६-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :– ५ ऑगस्ट, १९८९

वाचा :– १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रानिम-१२८६/प्र.क्र. ८६[१]/१३-अ, दि. ९.२.८८

२. शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०८९/ प्र.क्र. ३२६/८९/१६-ब, दिनांक १२.७.८९

शासन निर्णय :–

शासकीय, निमशासकीय सेवेत तसेच महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शासकीय उपक्रम, जिल्हा परिषदा व अनुदानीत संस्था, सहकारी संस्था, विद्यापीठे इत्यादी मधील मागास वर्गीयांच्या आरक्षित पदांच्या संदर्भात सरळ सेवा भरतीचा अनुशेष विशेष प्रयत्न करून ठराविक कालमर्यादेत भरून काढण्या-बाबत दि. १२ जुलै, १९८९ च्या शासन निर्णयान्वये शासनाने आदेश दिले आहेत. शासकीय कार्यालये, जिल्हापरिषदा, व नगरपरिषदां मधील वर्ग ३ ची पदे महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेत आहेत. वरील शासन परिपत्रकान्वये निश्चित केलेल्या कार्यक्रमानुसार मागास वर्गीयांच्या अनुशेषांकीपदे १ ऑक्टोबर, ८९ पूर्वी भरण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२. शासन निर्णय दि. ९.२.८८ अन्वये महाराष्ट्र राज्य दुय्यम सेवा निवड मंडळ व प्रादेशिक सेवा निवड मंडळांची स्थापना करण्यात आली आहे. या निवड मंडळांनी अंमलात आणण्याची कार्यपध्दती या शासन निर्णयाच्या परिशिष्ट ई मध्ये विहित करण्यात आली आहे. या परिशिष्टातील परिच्छेद २ [अ] [दोन] व [ब] [दोन] आणि [तीन] अन्वये निवडमंडळांना उमेदवारांच्या निवडीसाठी परीक्षा घ्यावी लागते. मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढण्याचा कार्यक्रम शासनाने विहित केलेल्या कालमर्यादेपर्यंत भरून काढण्यासाठी वरील परिच्छेदातील तरतुदी शिथील करणे आवश्यक आहे. म्हणून दि. ९.२.८८ च्या शासन निर्णयाच्या [अ] [दोन] व [ब] [दोन] आणि [तीन]

आदाप्रत

शाखा – ES

अन्वये विहित केलेली परीक्षा पध्दतीची तरतूद, मागास वर्गीयांचा अनुशेष भरून काढण्याच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी पुरती शिथील करण्यात शासन मंजुरी देत आहे. प्रस्तुत कार्यक्रमाकरिता मुलाखती व्दारा निवड करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

मु. स. मोकाशी

[मु. स. मोकाशी]
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ [लेखापरीक्षा], मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्यकार्यकारी अधिकारी,
सदस्य सचिव, महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ, मुंबई,
सदस्य सचिव, सर्व प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळे,
सामान्य प्रशासन विभाग, कार्या. क्र. १४-ब,
निवड नस्ती.

का. कि.
५८८९